# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 2262 0601, 2269 0602, 22641150/51. फॅक्स - 22692102

तार - EDUTECH E-mail : desk12@dte.org.in Internet :htpp/www.dte.org


**परिपत्रक**

क्रमांक :- १२/आस्था(२)/लघुलेखक(उ.श्रे.)/२०१३/३२०४

दिनांक :- 8 AUG 2013

संदर्भ :- १. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक – आरटीआर -१०९४/प्र.क्र. ८/ ९४/१२ दि.२४/६/१९९७.

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक – एएससी-१५९३/३६१९/१४-अ दि.३१/७/१९९७.

उपरोक्त संदर्भांकित दि.२४/६/१९९७ च्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र शासनाच्या "बृहन्मुंबई बाहेरील" कार्यालयातील स्वीय सहाय्यक, लघुलेखक(उ.श्रे.)/(नि.श्रे.), लघुटंकलेखक या पदाचे सेवाप्रवेश नियम निर्गमित करण्यांत आलेले आहेत. तसेच संदर्भंकित दि.३१/७/१९९७ च्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र शासनाच्या "फक्त बृहन्मुंबईतील" विविध शासकीय कार्यालयातील इंग्रजी व मराठी लघुलेखक (उ.श्रे.)/(नि.श्रे.), व लघुटंकलेखक या पदांचे सेवाप्रवेश नियम निर्गमित करण्यांत आलेले असून बृहन्मुंबई कार्यालयातील सदरहू लघुलेखक (उ.श्रे.)/(नि.श्रे.), लघुटंकलेखक पदे हि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे आहेत. मात्र यापुर्वी दि.७/१/२००९ रोजी लघुलेखक (नि.श्रे.) (वेतन संरचना वेतनबँड रू. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.४३००/-) या पदाची एकत्रीत सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यामुळे स्वतंत्र सेवाप्रवेश नियमांचा व स्वतंत्र संवर्गाचा विचार करता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या बृहन्मुंबई स्थित कार्यालयातील लघुलेखक (उ.श्रे.)(नि.श्रे.), लघुटंकलेखक या पदांसाठी बृहन्मुंबई संवर्ग आणि बृहन्मुंबई बाहेरील विभागीय कार्यालयातील पदासांठी विभागनिहाय स्वतंत्र संवर्ग असणे जास्त संयुक्तीक आहे.

त्यामुळे यापुढे उपरोक्त संवर्गासाठी स्वतंत्रपणे सेवाजेष्ठता यादया ठेवल्या जातील व लघुलेखक (उ.श्रे.) या बृहन्मुंबईतील कार्यालयातील पदांवर पदोन्नती करताना फक्त बृहन्मुंबई संवर्गातील सेवाजेष्ठता यादी विचारात घेवून कार्यवाही केली जाईल याची सर्व संबंधीतांनी नोद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
जा.क. विकाऔ/आस्था-३/२०१३/६६२४
दिनांक - 2 SEP 2013

प्रति
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/जिंतूर/पु.ला.लातुर/म.नि.लातुर/उस्मानाबाद/बीड
उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या उपरोक्त परिपत्रकातील तरतुदी आपल्या संस्थेतील लघुलेखक (नि.श्रे.)/ लघुटंकलेखक यांच्या निदर्शनास आणाव्यात.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी